**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटसॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २८७ वा | शनिवार, दि. २८ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# शक्तीपीठ महामार्ग विरोधात 1 जुलैला राज्यव्यापी चक्काजाम आंदोलन

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** शेतकऱ्यांच्यावर लादण्यात येतं असलेल्या शक्तीपीठ महामार्ग विरोधात, कृषी दिना दिवशी 1 जुलैला रस्त्यावर उतरण्याचा निर्णय आज गुरुवारी ऑनलाईन झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.



त्यानुसार शक्तीपीठ विरोधात 1 जुलैला सर्व जिल्ह्यांमध्ये महामार्ग रोखून चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय सवार्नुमते घेण्यात आला. तर राज्य सरकारने दडपशाही करू नये. पोलिसांनी यामध्ये हस्तक्षेप करू नये, असे आवाहन या बैठकीच्या निमित्ताने विधानपरिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी केले आहे.

नागपूर – गोवा प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाविरोधातील लढा आणखी तीव्र करण्यासाठी शेतकऱ्यांनी कंबर कसली आहे. या राज्यव्यापी आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी आज राज्यभरातील शेतकऱ्यांची ऑनलाईन बैठक संपन्न झाली. 12 जिल्ह्यातील बाधीत शेतकऱ्यांच्या बरोबरच राज्यातील इतर जिल्ह्यांमधील शेतकरी या बैठकीत सहभागी झाले होते. त्याच बरोबर विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, खासदार विशाल पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, खासदार नागेश पाटील, आमदार विश्वजीत कदम, आमदार अरुण लाड, आमदार दिलीप सोपल, आमदार चंद्रकांत नवघरे, आमदार प्रविण स्वामी ऑनलाइन सहभागी झाले होते.

शक्तीपीठ महामागार्साठी नुकतीच राज्य सरकारने वीस हजार कोटींची तरतूद केली आहे. भूसंपादनाची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे. त्यामुळं, शेतकऱ्यांच्यात उद्रेक असून, गरज नसलेला शक्तीपीठ महामार्ग आमच्यावर लादू नका, अशा तीव्र भावना या बैठकीत शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या.

### धाराशिवमधील शक्तीपीठ महामार्गाची मोजणी प्रक्रिया थांबवली

महाराष्ट्र सरकारनं शक्तीपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी 20 हजार कोटींना मान्यता दिली आहे. यानंतर शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. धाराशिवमधील शक्तीपीठ महामार्गाची मोजणी प्रक्रिया थांबवल्याचं पाहायला मिळालं. याचं कारणं शेतकरी आंदोलनाचा धसका हे आहे. राजू शेट्टी यांच्या बैठकीत धाराशिव प्रशासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे. यामुळं शेतकऱ्यांच्या विरोधापुढे सरकार अखेर झुकले असल्याचं पाहायला मिळालं. शेतकऱ्यांचा विरोध झुगारून प्रशासनाकडून धाराशिवमध्ये मोजणी करण्यात येत होती. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासनासोबत चर्चा केली. शक्तीपीठ महामार्गाच्या चर्चेला जिल्हाधिकारी गैरहजर राहिल्यानं राजू शेट्टी नाराजी व्यक्त केली.

## श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमानिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** १९८८ पासून श्री स्वामी समर्थांचे अन्नदानाचे कार्य करीत व सामजिक बांधिलकी जपत सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पर्यावरणकारक, क्रीडाविषयक कार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ-२२७९), अक्कलकोट हे धमार्दाय न्यास संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली राज्यातील धार्मिक क्षेत्रात नियोजनबध्द मांडणी आणि आखणी असलेल्या सामाजिकतेच्या बरोबरच विविध क्षेत्रात उल्लेखनिय व नेत्रदीपक प्रगतीची वाटचाल करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३८ वा. वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक हे कार्यक्रम दि. ३० जून ते ९ जुलै २०२५ पर्यंत आयोजन करण्यात



आल्याची माहिती न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली. सदरची पत्रकार परिषद अन्नछत्र मंडळात संपन्न झाली.

दि. ३० जून रोजी सोमवार सायंकाळी ६.३० मिनीटानी कार्यक्रमास प्रारंभ होणार असून, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामीजी, प.पू.श्री मोहन पुजारी झ मुख्य पुजारी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट, वे.शा.सं.श्री अण्णू महाराज झपुजारी श्री स्वामी समर्थ समाधी मठ अक्कलकोट, तहसिलदार विनायक मगर, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावर, उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी, अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शंकरराव कवितके, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थाचे प्रतिमाचे पूजन, दिप प्रज्वलनाने सदर कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

दि. ३० जून रोजी सोमवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत नक्षत्रांचे देणे, थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी ह्रदयनाथ मंगेशकर, राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.

दि. १ जुलै रोजी मंगळवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत, आदेश बांदेकर प्रस्तुत 'खेळ मांडियेला' खेळ, किस्से, गप्पा, साऱ्या कुटुंबासाठी हा कार्यक्रम होणार आहे.

दि. २ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत, मधुरा इव्हेंट प्रस्तुत 'रागा–अनुरागा' कन्नड चित्रपट गीतांचा कार्यक्रम सादरकर्ते– ख्यातनाम कन्नड गायिका अनुराधा भट व झी कन्नड वाहिनीचे प्रसिद्ध निवेदिका अनुश्री व सहकारी बेंगलुरु यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.

दि. ३ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'बेला शेंडे संगीत रंजनी' भावगीते, चित्रपटगीते व भक्तीगीते, सादरकर्ते झ ख्यातनाम मराठी गायिका बेला शेंडे आणि सहकारी, मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.

दि. ४ जुलै रोजी शुक्रवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत ख्यातनाम व्याख्याते प्रा.नितीन बानुगडे-पाटील यांचे 'छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर व्याख्यान सादर होणार आहे.

दि. ५ जुलै रोजी शनिवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार (पान 2 वर..)

## आषाढी वारी कालावधीत महिला भाविकांच्या सुरेक्षेबाबत आवश्यक दक्षता घ्यावी - उपसभापती डॉ. गोऱ्हे

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 06 जुलै 2025 रोजी होणार असून, या यात्रेसाठी पायी पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पालखी सोहळ्यासोबत येणा–या वारकरी भाविकांना पालखी मार्गावर व तळांवर तसेच यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात व परिसरात सर्व पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच पालखी सोहळ्यासोबत महिला भाविकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना आवश्यक सुविधा देण्यासोबत त्यांच्या सुरक्षेबाबत विशेष दक्षता घ्यावी अशा सूचना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री रुक्मिणी मंदीर देवस्थान व जिल्हा प्रशासनासोबत ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी सूचना दिल्या. यावेळी ऑनलाईन बैठकीस जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर पोलीस अधिक्षक प्रीतम यावलकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महावितरणचे श्री माने, कार्यकारी अभियंता अमित निमकर, भीमा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री हरसुरे,



तहसीलदार सचिन लंगुटे, महिला बाल विकास अधिकारी रमेश काटकर, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पालखी मार्गावर हिरकणी कक्ष, चेंजिंग रूम, सॅनिटरी नॅपकिन, वेडींग मशीन आदी व्यवस्थेची मुबलक उपलब्धता ठेवावी. पालखी मार्गावर लहान दिंड्यांनसाठी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करावी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्याही आरोग्य सुरक्षेची काळजी घेऊन त्यांना आवश्यक साधनांचा पुरवठा करावा. चंद्रभागा नदीपात्रात वाळूचे खड्डे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी तसेच धोक्याच्या ठिकाणी माहिती फलक व लाल रंगाच्या झेंड्याच्या निशाणी लावाव्यात. घाट दुरुस्तीची कामे करावीत. वारी कालावधीत अखंडित वीजपुरवठा राहील याची दक्षता घेऊन आवश्यक ठिकाणी मुबलक प्रकाश व्यवस्था करावी. वारी कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात पाणी पातळी योग्य प्रमाणात राहील याचे नियोजन करावे वारी कालावधीत शहरातील नागरिकांना तसेच भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होईल याची दक्षता घ्यावी. घनकचरा व्यवस्थापनाबाबत पंढरपूर शहर योग्य नियोजन करावे. परिवहन विभागाने पालखी मार्गावर अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी पथके तैनात ठेवावीत कोविडच्या अनुषंगाने आरोग्य विभागाने आवश्यक ते नियोजन करावे. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयातील जनरेटर व्यवस्था सुस्थितीत ठेवावी.

तसेच एसटी महामंडळाने महिला भाविक प्रवाशांसाठी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. वारी कालावधीत एसटी बस मधून प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते यासाठी महिला भाविकांसाठी काही अडचणी आल्यास तसेच महिला व बालके हरवल्यास टोल फ्री हेल्पलाइन नंबर प्रसिद्ध करावा तसेच तो प्रत्येक एसटी बस मध्ये लावावा. त्याचबरोबर लांब पल्ल्याच्या एसटी बस मध्ये रात्रीच्या वेळी लाईट चालू ठेवाव्यात. चंद्रभागा नदीपात्रा लगत असणाऱ्या दत्तघाटावर अनाथ मुले वयस्कर व मतिमंद नागरिकांना सोडून देण्यात येते. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महिला बाल विकास व सामाजिक न्याय विभागाने पथके नेमावीत या पथकात महिला पथकांचाही समावेश करावा अशा सूचनाही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, आषाढी यात्रा सोहळ्यात (पान 2 वर..)

## 'प्रभाग रचना अंतिम करण्यास वाढीव कालावधी'

### जिल्हा परिषद, पंचायत समितीचे वेळापत्रक जैसे थे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका आणि जिल्ह्यातील ११ नगरपरिषदा व एका नगरपंचायतीसाठी प्रारूप प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू झाली आहे. यापूर्वी प्रभाग रचनेसाठी १२ जून रोजी काढलेल्या आदेशात अंतिम प्रभागरचना प्रसिद्धीसाठी २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर अशी मुदत होती.

आता २३ जून रोजी काढलेल्या आदेशानुसार अंतिम प्रभाग रचनेसाठी २६ ते ३० सप्टेंबर अशी मुदत दिली आहे. महापालिका व नगरपरिषदेची प्रभागरचना अंतिम करण्यासाठी जवळपास एक महिन्यांचा वाढीव कालावधी मिळाला आहे.

पूर्वीच्या आदेशात प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्धी व दावे, हरकती स्वीकारण्यासाठी १५ ते २१ जुलै अशी मुदत महापालिका आयुक्त/नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना देण्यात आली होती. नव्या आदेशात ही मुदत १८ ते २१ ऑगस्ट अशी असणार आहे. जिल्हाधिकारी/जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी हरकतींवर सुनावणी घेण्यासाठी पूर्वी २२ ते ३१ जुलै अशी मुदत देण्यात आली होती. आता नव्या आदेशानुसार हरकती व सुनावणींसाठी २२ ऑगस्ट ते १ सप्टेंबर असा कालावधी असणार आहे.

जिल्हा परिषद (पान 2 वर..)

## आषाढीवेळी पंढरपुरात पूर येणार नाही! उजनीतून ४ टीएमसी पाणी सोडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारीवरील संभाव्य पूर संकट टाळण्यासाठी अवघ्या पाच दिवसांत उजनीतून चार टीएमसी पाणी सोडण्यात आले आहे. ४ ते ८ जुलै या काळात चंद्रभागेत अवघा पाच हजार क्युसेकचा विसर्ग राहील, असे नियोजन जलसंपदा विभागाने केले आहे.

मुसळधार पाऊस झाला तरी उजनीत तीन-चार दिवस तो पूर्ण विसर्ग साठवून ठेवता येईल, यासाठी धरणातील पाणीसाठा ७७ टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत आणला आहे.

श्री पांडुरंगाच्या आषाढी सोहळ्यासाठी अंदाजे १३ ते १५ लाख भाविक ६ जुलै रोजी पंढरपूरमध्ये असतील, असा प्रशासनाचा अंदाज आहे. त्यादृष्टीने



जिल्हा प्रशासनाने नियोजन केले आहे. पण चंद्रभागेच्या वाळवंटात पाण्याचा मोठा विसर्ग राहिल्यास त्याठिकाणी थांबणाऱ्या दोन ते तीन लाख वारकऱ्यांची पयार्यी सोय कोठे करता येईल, यावर प्रशासनाचे विचारमंथन सुरू आहे. मात्र, १५ ते २० हजार क्युसेकचा विसर्ग राहिला तरी चंद्रभागेच्या वाळवंटात पाणी राहते. त्यामुळे वारी काळात उजनीतून सोडला जाणारा विसर्ग पाच हजारांपर्यंतच असावा, यादृष्टीने सध्या भीमा नदीतून सध्या मोठा विसर्ग सोडून दिला जात आहे.

दुसरीकडे आपत्ती व्यवस्थापन विभागाचेही तगडे नियोजन झाले असून चंद्रभागेच्या वाळवंट परिसरात किती (पान 2 वर..)




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन



**डॉ.अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu )., P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

**सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक**
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

www.sextreatment.in
94 22 23 90 13




**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर



निरामय पॅरालिसिस सेंटर
**प्रत्येक जिल्ह्यात फ्रेंचाइजी देणे आहे**

फ्रेंचाइजी का घ्यावी?
- No Royalty.
- कमीत कमी Operating Cost.
- तुलनेने सर्वाधीक नफा मिळेल.
- अनुभवी डॉक्टर
- अनुभवी स्टाफ
- कमीत कमी गुंतवणुक

फ्रेंचाइजी साठी आजच संपर्क करा
9503310568





दैनिक सोलापूर www.katusatya.in **कटूसत्य** katusatya@gmail.com | मुख्य कार्यालय | संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे | उपसंपादक सचिन मोहन जाधव | सोलापूर **वृत्तदर्पण** न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

## आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिप:- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# कृषी क्षेत्रात 'एआय'

सध्या जगभरात सर्वत्र सर्वच क्षेत्रांत बोलबाला असलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता या तंत्रज्ञानाचा वापर महाराष्ट्रात शेती क्षेत्रात करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळ बैठकीमध्ये एक धोरण ठरवण्यात आले. अनेक दिवसांपासून राज्याचे प्रतिनिधित्व करणारे अनेक मंत्री आणि आमदार सातत्याने कृषी क्षेत्रात 'एआय'चा वापर करण्याबाबत विचार सुरू असल्याच्या घोषणा करत होते. आता सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीतच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठी एक धोरण निश्चित केले असून त्याचा फायदा राज्यातील शेतकर्‍यांना होईल अशी आशाही व्यक्त केली आहे. जागतिक पातळीवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्या विविध गोष्टी सुरू आहेत त्याचा वापर भारतात किंवा महाराष्ट्रात करणे हे समजण्यासारखे असले, तरी अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्र असलेल्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या क्षेत्राला संजीवनी देण्याचे काम होऊ शकते का, याचा विचार करावा लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये जगातील अनेक देशांनी कृषी क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करायला सुरुवात केली आहे. सर्वसाधारणपणे शेती क्षेत्राला ज्या समस्या जाणवतात त्या समस्यांना उत्तर मिळावे यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर जगात इतरत्र केला जात आहे. त्याच पद्धतीने महाराष्ट्रातही हे तंत्रज्ञान वापरण्यात आले तर देशात शेतकर्‍यांच्या आत्महत्यांमध्ये प्रथम क्रमांक असलेल्या महाराष्ट्रात बळीराजाला दिलासा देण्याचे काम होऊ शकते. मुळात संपूर्ण भारताप्रमाणे महाराष्ट्रातीलही बहुतांशी शेती पावसावर अवलंबून आहे. हवामानाचा अचूक अंदाज जर मिळाला नाही आणि कधी पाऊसच पडला नाही किंवा कधी गरज नसताना मुसळधार पाऊस पडला तर शेतकर्‍याचे सर्व नियोजनच कोलमडून जाते.

जगात इतरत्र जेथे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान वापरले जाते तेथे प्रामुख्याने शेतकर्‍यांना हवामानाचा आणि पावसाचा अचूक अंदाज मिळावा याला प्राधान्य दिले जाते. साहजिकच महाराष्ट्रातही तंत्रज्ञान वापरताना हवामानाचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही यासाठी या तंत्रज्ञानाचा अचूक वापर होणे गरजेचे आहे. ऋतुचक्र सातत्याने बदलत असल्याने दरवर्षी पाऊस आपली सरासरी पूर्ण करत असला तरी जेव्हा हवा तेव्हा तो पडत नाही आणि जेव्हा त्याची गरज नसते तेव्हा तो प्रचंड प्रमाणात पडतो असाच गेल्या काही वर्षांचा इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर शेतीला आवश्यक असलेल्या हवामानाच्या विषयामध्येच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याची गरज आहे.

याव्यतिरिक्त गेल्या काही वर्षांपासून नागरीकरणाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामीण भागातील कामकरी लोक मोठ्या प्रमाणात शहराकडे स्थलांतरित होत आहेत. साहजिकच शेतीवर काम करर्णाया लोकांची संख्या कमी होत आहे. शेतमजूर मिळत नाहीत. जास्त मजुरी देऊन शेतीची कामे करून घ्यावी लागतात. दक्षिण आफ्रिकेच्या काही भागांमध्ये ज्या ठिकाणी शेती क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात आला तेथे प्रामुख्याने जी मनुष्यबळाची टंचाई जाणवते. त्याच्यावर उपाययोजना करण्यासाठी हे तंत्रज्ञान वापरण्यात आले. साहजिकच महाराष्ट्रातही अशाच प्रकारे हे तंत्रज्ञान वापरणे शक्य आहे.

अर्थात, या सर्व गोष्टी होत असतानाच शेती फायदेशीर कशी होईल हे पाहण्यासाठीसुद्धा ही कृत्रिम बुद्धिमत्ता वापरता येईल का, हेही पाहावे लागेल. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतमालाला जर योग्य भाव मिळाला तर शेती फायदेशीर होऊ शकते. खतांच्या आणि बियाण्यांच्या वाढत्या किमती, पाणीपुरवठ्याची अनियमितता यामुळे शेतकर्‍याचा उत्पादनखर्च कधीच समान राहात नाही. दरवर्षी तो बदलत राहतो. त्यामुळे ठरावीक पद्धतीने त्याच्या शेतमालाला किंमत देणे शक्य होत नाही. मधल्या मध्ये दलाल मात्र पडत्या किमतीला शेतमाल खरेदी करून स्वतःचे उखळ पांढरे करतात; पण शेतकर्‍याच्या हातात काहीच राहात नाही.

सरकारच्या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणामध्ये विविध गोष्टींचा समावेश असला, तरी महाराष्ट्रातील शेतकर्‍यांची शेती किफायतशीर आणि फायदेशीर कशी होईल, या गोष्टीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागणार आहे. शेतकर्‍याची शेती फायदेशीर होत नसल्यामुळेच त्याचा कर्जबाजारीपणा वाढत जातो आणि यातून आत्महत्यांचे प्रमाणही वाढत जाते ही साखळी जर तोडायची असेल, तर कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकर्‍याला त्याच्या शेतीतून चांगला नफा मिळायला हवा. येत्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र सरकारच्या या कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणाचे विविध तपशील समोर येतीलच.

गेल्या काही वर्षांमध्ये हे तंत्रज्ञान समोर आल्यापासून अनेक क्षेत्रांमध्ये त्याचा फायदाच दिसून आला आहे. तसाच फायदा शेती क्षेत्रामध्येही दिसून आला, तर त्याचे स्वागतच करावे लागेल. अर्थात, काहीतरी नवीन करायच्या ईर्ष्येतून नाही तर शेतकर्‍यांना फायदा होईल या खर्‍या अपेक्षेतून अशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतला असेल, तर त्या निर्णयाची अंमलबजावणीसुद्धा तेवढ्याच खरेपणाने आणि गंभीरपणे करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारला घ्यावी लागणार आहे. इतर क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेकडे एक आव्हान म्हणून पाहिले जात असताना, शेती क्षेत्रासाठी ते वरदान ठरू शकेल हे या निमित्ताने महाराष्ट्र सरकारला सिद्ध करावे लागेल.

# पी.एम. किसान व नमो शेतकरी योजने विषयी माहिती

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना फेब्रुवारी 2019 पासून केंद्र शासनाने देशभरातील शेतकर्‍यांच्या आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी सुरू केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे. तर नमो शेतकरी महासन्मान निधी योजना ही नोव्हेंबर 2023 पासून महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकर्‍यांसाठी सुरू केलेली योजना असून या दोन्ही योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकर्‍यांनी घ्यावा.

**1.प्रधानमंत्री किसान सन्मान ;निधी योजना (पी.एम. किसान): योजनेचे स्वरुप**

पी एम किसान योजना देशभरातील जमीनधारक शेतकर्‍याच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी फेब्रुवारी 2019 मध्ये सुरू करण्यात आली या योजनेतंर्गत थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे शेतकर्‍यांच्या आधार संलग्न बँक खात्यात तीन समान हप्त्यामध्ये प्रति वर्ष 6 हजार रुपये हस्तांतरीत केले जातात.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत लाभ मिळण्यासाठी पात्रता–

1) कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ देय राहील. (पती, पत्नी किंवा 18 वर्षा खालील मुलास लाभ मिळत असल्यास कुटुंबातील इतर सदस्यास लाभ मिळणार नाही.)

2) लाभार्थ्यांच्या नावे जमीन असणे आवश्यक. (फेरफार फेब्रुवारी 2019 च्या पूर्वीचा असावा), अपवाद मयत शेतकर्‍याकडून वारसा हक्काने जमीनीचे हस्तांतरण झाल्यास लाभ देय)

– अर्ज कोठे करावा :

केंद्र शासनाच्या पी एम किसान पोर्टल वर स्वयं नोंदणी करणे.

सामुहिक सुविधा केंद्र (CSC) मार्फत पोर्टलवर नोंदणी.

ड्पी एम किसान योजने अंतर्गत नोंदणीकृत लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी खालील आवश्यक बाबी.

1) भूमि अभिलेखेप्रमाणीकरण (महसूल विभागामार्फत)

2) आधार प्रमाणीकरण

3) e-KYC प्रमाणीकरण.

2.नमो शेतकरी महासन्मान निधी योजना:–

1.प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धरतीवर महाराष्ट्र शासनाने राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना नोहेंबर 2023 पासून सुरू केलेली आहे.

2.या योजनेत पात्रतेच्या अटी व शर्ती पी एम किसान योजनेप्रमाणेच असून जे साभाली पी एम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र आहेत. त्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळेल.

– योजनेचा लाभ कोणास घेता येणार नाही.

सर्व संस्थात्मक जमीनधारक, घटनात्मक पदांचे माजी आणि वर्तमानधारक जिल्हा परिषदांचे माजी वर्तमान सदस्य, महानगरपालिकांचे माजी आणि विद्यमान महापौर, निवृत्ती वेतनधारक ज्यांचे मासिक पेन्शन 10 हजार रुपये किंवा अधिक आहे. माजी आणि विद्यामान मंत्री राज्यमंत्री लोकसभा/ राज्यसभा / राज्यविधानसभा / राज्यविधान, जिल्हा परिषदेचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, केंद्र राज्य सरकारची नियमित कर्मचारी, सेवा निवृत्त (मल्टीटास्किंग स्टाफ खात / गट ड कर्मचारी वगळून) आयकर भरणारे डॉक्टर, अभियंता, वकील, चाटर्ड अकाऊंटंट आणि वास्तुविशारद यांसारखे व्यावसायिक संस्थेमध्ये नोंदणीकृत आहेत आणि सराव करुन व्यवसाय पार पाडतात अशा व्यक्तीना या योजनेत लाभ घेता येणार नाही.

– सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी ग्रीस्टॅक योजने अंतर्गत फार्मर आयडी असणे अनिवार्य आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकर्‍यांनी पीएम सन्मान निधी योजना व नमो शेतकरी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर

# सांगोला तालुक्यासाठी नवीन एम.आय. डी.सी.मंजूर करणार – उद्योगमंत्री सामंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):–** सांगोला तालुक्याचे माजी आमदार ॲड. शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन भव्य एम. आय. डी. सी .उभारावी अशी मागणी उद्योगमंत्री नाम.उदय सामंत यांची भेट घेऊन केली . सांगोला तालुक्यातील तरुणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी नवीन एम. आय. डी. सी .मंजूर करण्याचे आश्वासन माजी आम. ॲड. शहाजीबापू पाटील यांना दिले आहे. नवीन एम.आय. डी.सी मुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होणार आहे. आमदार ॲड.शहाजीबापू पाटील यांनी केलेल्या मागणीला मोठे यश आले आहे. भविष्यात उद्योग व्यवसाय वाढल्याने तालुक्यात क्रांती होईल अशी माहिती सांगोला तालुक्याचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या भेटीप्रसंगी उद्योगपती अभिजीत नलवडे, योगेश खटकाळे, विशाल खटकाळे हे मान्यवर उपस्थित होते.

माजी आम.ॲड. शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला व पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. नवीन एम .आय. डी. सी. निर्मितीमुळे भविष्यात तालुक्यात उद्योगाचे जाळे निर्माण होवून तालुक्याची अर्थव्यवस्था बळकट होईल . तरुणांना नोकरी मिळेल. त्यामुळे सांगोला तालुक्याचा व्यापारीदृष्ट्या विकास होईल व तालुक्याच्या विकासास चालना मिळेल. व्यापारी व औद्योगिकदृष्ट्या तालुक्याचा कायापालट होणार आहे अशी माहिती माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे.

# आषाढीवेळी पंढरपुरात पूर येणार नाही!...

प्रमाणात मोठा विसर्ग असल्यास वारकर्‍यांना नदीत कुठपर्यंत येता येईल, याचेही नियोजन सुरू आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी बचाव पथके, अत्याधुनिक बोटी देखील त्याठिकाणी नदीपात्रात सोडण्यात येणार आहेत.

**वारी काळात वारकर्‍यांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाय**

आषाढीवेळी वाळवंटात किती पाणी राहील, ही माहिती जलसंपदा विभागाकडे आहे. पण, वारी काळात एकूण १० बोटी नदीपात्रात भाविकांच्या सुरक्षेसाठी असतील. कोल्हापूर, पुणे, सोलापूर येथील बचाव पथके असतील. राज्य आपत्ती व्यवस्थापनाचे एक पथक राहील. २१ जूनपासून आतापर्यंत आमच्या टीमने १२ जणांचे जीव वाचविले आहेत. वारी काळात सुक्ष्म नियोजन असणार आहे.

– शक्तीसागर ढोले, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, सोलापूर

**पाच दिवसांत सोडले चार टीएमसी पाणी**

उजनी धरण रविवारी (ता. २२) ७७ टक्के भरले होते. त्यावेळी धरणात १०५ टीएमसी पाणी होते. आषाढी वारीच्या वेळी चंद्रभागेच्या वाळवंटात कमीत कमी कमी पाणी राहील, यासाठी उजनीतून पाच दिवसात चार टीएमसी सोडण्यात आले आहे. सध्या उजनीतून २१ हजार ६०० क्युसेकचा विसर्ग भीमा नदीतून सोडला जात आहे. धरणात सध्या दौंडवरून १३ हजार आणि स्थानिक पावसाचा विसर्ग १० हजार क्युसेकचा जमा होत आहे.

## प्रबोधन

# बुद्धिनिष्ठ व्हा

जगातील माणसांचे ज्ञानाच्या आधारे दोन ठळक भेद करता येतात. शिक्षित आणि अशिक्षित, शिक्षितांचाही प्रकारभेद केला पाहिजे. उदा. अल्पशिक्षित, पदवीधारक, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आणि व्यासंगी विद्वान इत्यादी. अशिक्षितांचे प्रकारभेद संभवत नाहीत. सर्व अशिक्षित इथून तिथून सारखेच असतात. वास्तविक शिक्षितांमधील अल्पशिक्षितच नव्हे, तर पदवी पातळीपर्यंतचे शिक्षितसुद्धा स्वतःच्या बुद्धीने चालणारे, वागणारे, विचार करणारे, बुद्धिप्रधान जीवन स्वतंत्रपणे जगणारे असतातच, असे नाही. मग खरा शिक्षित कोणास म्हणावे ? तर जो स्वयंप्रज्ञ आहे, स्वनिर्णयक्षम आहे, शुद्ध बुद्धिप्रामाण्यवादी आहे, तो खरा शिक्षित. असा शिक्षितच जीवनाच्या रणभूमीत पक्के पाय रोवून उभा असतो. अशा व्यक्तीच्या तुलनेने अशिक्षित 'व्यर्थ जगणारे' ठरतात. कारण–

ज्ञानाविण जन, किडामुंगीपरी
बिचारे व्यर्थचि, जगतात ॥१॥
कळते न त्याला, जगायचे कसे
वागायचे कसे, जीवनात ॥ २ ॥
दुःख पश्चात्ताप, मुकाट सोसती
बाहेर न येती, दुःखातून ॥ ३ ॥
बुद्धिनिष्ठ झालो, म्हणूनी तरलो
नाहीतरी मेलो, असतो मी ॥ ४ ॥
ज्ञानाचि जाहला, तारणारा मंत्र
ज्ञान होकायंत्र, जीवनाचे ॥५॥
ज्ञानानेच केला, मार्ग साफ जेव्हा
चाललो मी तेव्हा, विश्वासाने ॥६॥

जगात दुःखं आहेत. जीवन दुःखपूर्ण आहे. हे सत्य तर वैदिक–अवैदिक तत्त्वज्ञानाचे अभ्यासक मान्य करतातच. याबाबतीत दुमत संभवत नाही. महात्मा गौतम बुद्धही दुःखमय जीवनावर उपाय शोधू पाहातात आणि आद्य शंकराचार्यही दुःखाचं जीवनव्यापी रूप स्पष्ट करतात. त्यांचा 'जन्म दुःखं, जरा दुःखं, व्याधि दुःखं पुनःपुनः,' हा विचार अनेक लोक जाणतात आणि हे दुःख हीच मानवी जीवनाची मूलभूत समस्या आहे, असं अगदी संत तुकाराम महाराजांपर्यंत सर्वांनी म्हटलं आहे. (सुख पहाता जवापाडे दुःख पर्वताएवढे–तुकाराम) पण खरी गोष्ट काहीशी वेगळी आहे.

जगातील अशिक्षित हे खरे दुःखभोगी आहेत. त्यांचं जीवन किडामुंगीसारखं असल्याने समाजाच्या सर्व प्रकारच्या त्रासाला ते बळी पडतात. जीवन म्हणजे काय? जगणं कसं बरं ? असं जगणं बरं नाही? जीवनाचं ध्येय काय असावं? जीवनाचा आनंद शोध कसा असतो? श्रेयस्कर काय? आपणाला कोणते त्रास आहेत? त्यांची कारणं कोणती? दुःख दूर करण्याचे सोपे मार्ग कोणते ? या प्रश्नांचा गंधही त्यांना नसतो. 'पशुतुल्य जीवन' या दोन शब्दांतच त्यांच्या जीवनाचा इत्यर्थ सांगता येईल. महात्मा जोतिरावांनी त्यांच्या संबंधी सूत्रबद्ध विचार सांगून 'एका अविद्येने इतके अनर्थ केले,' असा मथितार्थ सांगितला.

उलटपक्षी जे स्वप्रज्ञ (शिक्षित, पदवीधर नव्हे) आहेत. ज्यांची तर्कशक्ती वैचारिक अवकाश भेदून जाईल अशी लखलखीत आहे. त्यांना व्यवहाराच्या भाषेतील दुःख बाधत नाहीत. त्यांची बुद्धी प्रत्येक समस्येचं समाधानकारक उत्तर त्यांना देत असते. म्हणून त्यांच्या जीवनात एक अफाट, गगनभेदी, दिक्कालाच्या आरपार जाणारं सामर्थ्य सतत दिसून येतं. महात्मा गांधींचं हसरं चित्र नजरेसमोर आणा. दुःखाच्या वास्तवावर त्या हास्याने जी मात केली, तिला जगाच्या इतिहासात तोड नाही. एक राजकीय नेता एवढं दिलखुलास हास्य कसं करू शकतो? संक्षेपाने त्याबाबत एवढंच म्हणता येईल की, ते स्वयंप्रज्ञ, महान बुद्धिनिष्ठ होते. आपण या मार्गानं वाटचाल करू या आणि चिरंतन सुखी होण्यासाठी बौद्धिक प्रगतीची साधना करू या.

महाथोर आत्मा । राष्ट्रपिता गांधी ।
वंदावे ते आधी । त्याचे पाय ॥ १ ॥
भारतमातेचा । लाडका सुपुत्र ।
मानवतावादी । सर्वार्थाने ॥ २ ॥
थोर संस्कृतीचा। पाईक तो खरा ।
अहिंसावादाचा । पुरस्कर्ता ॥ ३ ॥
स्वतः तो सत्य । सत्याग्रह त्याने
करूनी माणसा । थोर केले ॥ ४ ॥
प्रतिकारनिष्ठा । प्राणतत्त्व त्याचे ।
थोर उपासक। जीवनाचा ॥५॥
प्रयोगाने सत्य । सदा आकळले ।
त्याजला कळले अंतिम सत्य ॥ ६ ॥
तत्त्व हाच प्राण । भक्ती जीवनाची ।
मुक्ती सेवाधर्मी ! प्राप्त केली ॥७॥
निर्भयता मनी । मारून मरणा ।
झाला मृत्युंजय । तत्त्वासाठी ॥८ ॥
मारणारा त्यांना । निंदापात्र झाला ।
मरूनी जिंकले। गांधीजींनी ॥ ९ ॥



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# आषाढी वारी कालावधीत महिला भाविकांच्या..

वारकर्‍यांना केंद्रबिंदू मानून व स्वच्छतेला प्राधान्य देऊन आषाढी वारीचे नियोजन करण्यात आले आहे.वारी कालावधीत पाऊस जास्त होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व पालखीतळांवर मुरमीकरण करण्यात आले आहे. तसेच पालखी मार्गावर भाविकांच्या सुविधेसाठी जर्मनी हँगर, वॉटरप्रूफ मंडप उपलब्ध करण्यात येणार आहेत. पालखी मार्गावर व तळांवर शहरात मुबलक टॉयलेट, पाणीपुरवठा, सुरक्षा, महिला भाविकांसाठी सुलभ शौचालय, स्नानगृह, हिरकणी कक्ष, सॅनिटरी नॅपकिन, चेंजिंग रूम, वेंडिंग मशीन यांची उपलब्धता ठेवण्यात येणार आहे.

तसेच आरोग्य सुरक्षेसाठी मुबलक औषधे सुसज्ज रुग्णवाहिका आरोग्य केंद्र उपलब्ध करण्यात येणार आहेत.

पंढरपूर शहरात वारकरी भाविकांना अडथळा येऊ नये यासाठी अतिक्रमण मोहीम राबविण्यात येत आहे. तसेच शहरात वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी साडेतीनशे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर गर्दी नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आले आहेत असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

यावेळी उपसभापती डॉक्टर नीलम गोर्‍हे यांनी पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर जतन संवर्धनच्या कामाबाबतची माहिती घेतली.

तसेच वारकरी भाविकांसाठी पालखी मार्गावर व पंढरपूर शहरात करण्यात आलेल्या सोयी सुविधांबाबत विस्तृत माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या.

# 'प्रभाग रचना अंतिम करण्यास वाढीव कालावधी'...

व पंचायत समित्यांच्या गट–गण रचनेसाठी शासनाने पूर्वी जाहीर केलेले वेळापत्रक कायम आहे. जुन्या वेळापत्रकात काहीही बदल झालेला नाही. त्यामुळे १४ जुलै रोजी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणाची प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप प्रभाग रचनेवर दावे, हरकती स्विकारून त्यावर सुनावणी घेतली जाणार आहे.

त्यानंतर १८ ऑगस्टपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समितीची प्रभाग रचना अंतिम केली जाणार आहे. महापालिका व नगरपरिषदेच्या आगोदर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची प्रभाग रचना अंतिम केली जाणार असल्याने प्रत्यक्ष निवडणूकही जिल्हा परिषदेची आगोदर होईल, असा अंदाज बांधला जात आहे.

पान १ वरून

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या....

ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे.

दि. ६ जुलै रोजी रविवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत महाराष्ट्राचे हास्य जत्रा सादरकर्ते समीर चौगुले, ओंकार राऊत, अरुण कदम, विनता खरात, पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शनी इंदलकर, प्रभाकर मोरे, शिवाली परब यांचा धमाल उडवणारा कार्यक्रम होणार आहे.

दि. ७ जुलै रोजी सोमवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'शरण–गुरु–चरण' नृत्यशैलीमधून गुरुवंदन सादरकर्ते– गुरु आभा वांबूरकर, गुरु स्मिता महाजन आणि शिष्यवर्ग, पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.

दि. ८ जुलै रोजी मंगळवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत स्वामिनी प्रस्तुत, 'रंजनी गंधा' मराठी व हिंदी गितांचा कार्यक्रम सादरकर्ते– संदिप पाटील आणि सहकारी, पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.

दि. ९ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, निपाणी प्रस्तुत 'सुर भक्तीचे उमटले' भक्ती संगीत कार्यक्रम होणार आहे.

दि. १० जुलै रोजी गुरूपौर्णिमे निमित्त गुरुवार सकाळी ७ ते ९ पर्यंत महाप्रसादगृह येथे श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वा. खालील मान्यवरांच्या हस्ते श्रींची महाआरती व महानवैद्य दाखविण्यात येणार आहे. यांच्या हस्ते–खासदार– श्रीरंग बारणे, मावळ पुणे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, शिवाजीराव फुंदे, स्वामीभक्त, मुंबई, ह.भ.प. गंजीधर महाराज, नागेश्वर संस्थान, पळसखेडा–मुर्तड, ता. भोकरदन, जि. जालना, महेश गावस्कर, सी .ए. पुणे, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष व न्यासाचे विश्वस्त जनार्दन उर्फ अण्णा थोरात, प्रभाकर शिंदे सन्मा. देणगीदार, छत्रपती संभाजीनगर, (देणगीदार व पालखी संयोजक शिरवळ, पुणे), यांच्या हस्ते आणि अतिथींच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

**एक दृष्टिक्षेप– नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर :**

नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य– भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे. सध्या गेल्या नोव्हेंबर–२०२४ पासून सदरचे काम प्रगतीपथावर आहे, येत्या ३ वर्षात हे महाप्रसादगृह भक्तांच्या सेवेत असणार आहे.

दि. १० जुलै रोजी गुरुवार सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, सायं ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या भव्य मिरवणूकीचा दिंड्या व वाद्यांचा गजरात आणि अतुल बेहरे पुणे यांच्या 'नांदब्रम्हे' या ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझिम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ संदिप खर्डेकर– महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता भाजपा, अध्यक्ष– उद्यम विकास सह. बँक, विश्वस्त– कर्वे समाज सेवा संस्था पुणे, राहुल वाळंज –अध्यक्ष सह्याद्री क्रिडा मंडळ (न्यास) टिळक नगर चेंबूर, बाळासाहेब दाभेकर झअध्यक्ष भरत मित्र मंडळ पुणे, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, सो.म.पा. मा.स्थायी समिती चेअरमन व शहर–जिल्हाध्यक्ष (कॉंग्रेस) चेतन नरोटे, सो.म.पा. माजी उपमहापौर दिलीप (भाऊ) कोल्हे, सो.म.पा.मा.शिक्षण सभापती संकेत पिसे, सोलापूर, ॲड. नितीन हबीब– कायदेशीर सल्लगार, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व जेष्ठ विधिज्ञ यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

दि. ३० जून ते १० जुलै पर्यंत 'रक्तदान शिबीराचे' आयोजन करण्यात आलेले आहे. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व निवेदन श्वेता हुल्ले या करणार आहेत. तरी सदरच्या कार्यक्रमाचा लाभ महाराष्ट्रासह, कर्नाटक आणि अन्य राज्य व परदेशातील स्वामी भक्तांनी घेण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी केले आहे. यंदाच्या वर्षी सदरचे कार्यक्रम होणार असून कार्यक्रमाचे हे २६ वे वर्ष आहे.

सध्या आषाढी वारी निमित्त दररोज हजारों स्वामी भक्त अन्नछत्र मंडळात येत आहेत. उभी स्वामींची मुर्ती, महाप्रसादगृह, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, वाटिका व बालोउद्यान, शिवचरित्र धातू शिल्प प्रदर्शन हे पाहण्यासाठी स्वामी भक्तांची मोठी गर्दी होत आहे. यात्री निवास, यात्री भवन, प्रशस्त वहानतळ स्वामी भक्तांनी गजबजलेले व फुलून गेले आहेत.

**गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार :**

दि. ३० जून ते ९ जुलै दरम्यान गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार व सत्कार हे सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या पत्रकार परिषदेस मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, लक्ष्मण पाटील, मनोज निकम, अनिकेत सोनटक्के व न्यासाचे विश्वस्त, क्रियाशील सभासद, सेवेकरी व कार्यकर्ते हे उपस्थित होते.

## वात्रटिका

### व्वा नेते व्वा

पाण्यावर लोणी काढून
असे कसे मग्रूर झाले...
सत्ता आणि पदामुळे
नको ते बोलून गेले...
असे बोलणे,वागणे आणि
हा निर्लज्ज पणा आहे...
फुशारकी मारून केलेली
नालायक वल्गना आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ॲडव्हेंचर पार्क महिनाभरात सुरू करणार !



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका उपसमितीच्या बुधवारी झालेल्या बैठकीत अँडव्हेंचर पार्क आणि हुतात्मा गार्डनसाठी मक्तेदार निश्चित करण्यात आले. महिनाभरात ॲडव्हेंचर पार्क सुरू होईल,

अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेतून कोट्यवधी रुपये खर्च करून शहरात ॲडव्हेंचर पार्क विकसित करण्यात आले होते. नव्याची नवलाई झाल्यानंतर हे पार्क बंद झाले. बागेतील साहित्य खराब झाले. त्याच्या दुरुस्तीवर महापालिकेचा मोठा खर्च झाला.

स्मार्ट सिटीतून झालेल्या कामांची योग्य विल्हेवाट लावण्याचा निर्णय महापालिका आयुक्तांनी घेतला आहे.

त्यांनी पहिल्या टप्प्यात मक्तेदार महापालिकेला देणार आहे. येत्या महिनाभरात ॲडव्हेंचर ॲडव्हेंचर पार्क, सिध्देश्वर तलाव परिसरांतील वॉकिंग ट्रॅक, बाबागाडी याचे मक्तेदार निश्चित केले.

या ठिकाणची देखभाल दुरुस्ती आणि सोयी सुविधांचा खर्च मक्तेदाराकडून करण्यात येणार आहे. शिवाय दरमहा ७५ हजार रुपये संबंधित पार्क सुरू करण्यात येणार आहे. दिवाळीपर्यंत टप्प्याटप्प्याने हा संपूर्ण प्रकल्प लोकांसाठी उपलब्ध होईल, असे उपायुक्त आशिष लोकरे यांनी सांगितले.

हुतात्मा गार्डनचाही मक्तेदार निश्चित करण्यात आला असून या संपूर्ण परिसराच्या देखभाल दुरुस्तीचा खर्चही संबंधित मक्तेदार करणार आहे. या ठिकाणी अतिरिक्त खेळण्याचे साहित्य आणि इतर सोयी

सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत.

साधारण साहित्य वापराकरिता कोणतेही शुल्क लागणार नाही. मात्र, इतर व्यावसायिक खेळणी व साहित्याला शुल्क घेण्यात येईल. हुतात्मा गार्डन आणि ॲडव्हेंचर पार्कसाठी तीन वर्षाची मक्ता देण्यात येत आहे, असेही आयुक्तांनी सांगितले.

### उपायुक्त लोकरे नोडल अधिकारी नियुक्त

सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेंतर्गत झालेल्या विविध विकासकामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नोडल अधिकारी म्हणून उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातली आवश्यक ती सर्व जबाबदारी उपायुक्त लोकरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

# राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समतेचे कार्य केले- प्रा. रमेश चव्हाण



**अनगर (कटूसत्य वृत्त):-** राजर्षी शाहू महाराजांनी संपूर्ण आयुष्यभर दिन दलित,उपेक्षित, शोषित समाजा समाजाच्या न्याय हक्कासाठी कार्य केले व त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले म्हणून राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने लोकांचे राजे होते असे मत प्राध्यापक रमेश चव्हाण यांनी मांडले.

येथील पाटील विद्यालयात सामाजिक न्याय दिन आणि कवी कालिदास दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत ढोले हे होते तर, उपप्राचार्य महादेव चोपडे, पर्यवेक्षक माधव खरात, तसेच राजेंद्र डोके यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात कवी कालिदास यांच्या जीवन व साहित्यावर राजेंद्र डोके यांनी प्रकाश टाकला.

कालिदास यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी कालिदास यांचे संस्कृत वाङ्मयातील योगदान आणि त्यांच्या रचनांमधील संस्कृतीचे दर्शन विषद केले.

या वेळी प्राध्यापक रमेश चव्हाण यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर भाष्य केले. त्यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक सुधारणांच्या कायार्चा आढावा घेत, त्यांच्या माध्यमातून समाजात कसे परिवर्तन घडून आले याचे विवेचन केले.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समतेचे मूल्य आणि साहित्यिक वारशाबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या हेतूने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी हनुमंत गुंड यांनी सूत्रसंचालन केले तर माधव खरात यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी बब्रुवान बोडके, परमेश्वर थिटे, गोरख गायकवाड, दाजी गुंड, विलास गुंड, सत्यवान कांबळे, पांडुरंग शिंदे,सत्यवान दाढे सोमनाथ ढोले, उज्वला घोलप, अनुराधा गोडसे,अनुपमा वरवडकर आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सागर सिमेंटच्या महाराष्ट्रातील वितरकांचे गोवा दौऱ्यासाठी विमानाने प्रयाण




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील सिमेंट व बांधकाम क्षेत्रात कमी कालावधीत नावारूपास आलेल्या सागर सिमेंट लिमिटेड कंपनीच्या महाराष्ट्रातील वितरकांच्या परिषदेसाठी ( कॉन्फरेन्स) आज २७ जुन रोजी वितरकांनी सोलापूर विमानतळावरून गोव्यासाठी प्रस्थान केले.

गोवा सोलापूर विमानसेवा चालू झाल्यानंतर वितरकांची परिषद गोवा येथे घ्याचे ठरले होते, त्यानुसार विमान कंपनीला १३५ आसनांची मागणी केली होती परंतु विमानाची आसनक्षमता कमी असल्या कारणाने काही वितरक सोलापूर विमानतळावरून , काही वितरक हैद्राबाद आंतरराष्ट्रीय विमानतळावरून तर काही वितरक जळगाव विमानतळावरून आज रोजी गोव्यासाठी कंपनीचे महाराष्ट्र हेड श्री महादेव कोगनूरे साहेब ह्यांच्या नेतृत्वाखाली प्रस्थान केले.

आपल्या कंपनीचा एक अविभाज्य व महत्त्वाचा भाग असर्णाया वितरकांसाठी मागील वर्षी कंपनीने दुबई दौरा तसेच तीन महिन्याखालीच कझाकिस्तान दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

नव्याने सुरु सोलापूर विमानतळावरून इतक्या मोठया संख्येने वितरकांना घेऊन जाणारी सागर सिमेंट ही पहिली कंपनी ठरली असून हा सर्वत्र चचेर्चा विषय ठरला आहे.

गोवा दौऱ्यात वितरकांच्या परिषदेसोबत इतर विविध कार्यक्रमाचे आयोजन कंपनीने केले असून, दौरा आयोजित केल्याबद्दल सागर सीमेंट मॅनेजमेंट व कंपनीचे मार्केटिंग हेड श्री राजेश सिंग साहेब ह्यांचे श्री महादेव कोगनूरे साहेब यांनी मनापासून आभार मानले.

# वारकऱ्यांना सावली देणारे 'हरित वारी' उपक्रमास सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचा अभूतपूर्व प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यातील गोरगरीब वारकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय म्हणजे पंढरीचा पांडुरंग. या पांडुरंगाच्या भेटीसाठी प्रत्येक महिन्याच्या एकादशीला पंढरीची वारी करणारा वारकरी संप्रदाय आजही महाराष्ट्रात आहे. त्याच प्रमाणे 'आषाढी वारी' साठी तर राज्यातून वारकरी पायी चालत पंढरीची वारी करण्यासाठी पंढरपुरला येतात. या पायी चालत येणाऱ्या संतांच्या पालख्या या आषाढी वारीच्या कालावधीत चारही बाजूने सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करतात. वारकऱ्यांच्या वारी मार्गावर केंद्र शासन तसेच राज्य शासन यांच्या माध्यमातून मोठ मोठे रस्ते- महामार्ग तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे वारकऱ्यांची पायी वारी चा मार्ग सुकर झाला आहे.

परंतु या रस्त्यावरून जात असताना पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना सावलीची गरज होती. ही गरज ओळखून सोलापूर ग्रामीण दलाचे वृक्षप्रेमी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी वारकऱ्यांच्या पायी चालणाऱ्या मार्गावर सावली देणारी झाडे लावण्याचा निश्चय केला. पालखी मार्गावरील पोलीस ठाणे, ग्रामपंचायत, नागरिक, संघटना व संस्था यांना झाडे लावण्याबाबत आवाहन केले. त्यास जिल्ह्यातील पोलीस ठाणे व नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

जिल्ह्यात येणारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, संत सोपानकाका, संत जनाबाई, श्री गजानन महाराज व इतर लहान सहान दिंडीचे मार्गावर सावली देणारे चिंच, करंज, पिंपळ, वड, लिंब, अशा झाडांची लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील नातेपुते, अकलूज, माळशिरस, वेळापूर, पंढरपूर, करकंब मोहोळ, टेंभुर्णी मंगळवेढा, कामती व सोलापूर तालुका या पोलीस ठाणे हद्दीत प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यातील पालखी मार्गावर सुमारे 1,00,000 झाडांची लागवड करण्यात आली आहे. या झाडांची पुढील वाढ व त्यांचे संरक्षण करण्यासाठी देखील मा. पोलीस अधीक्षक यांनी योजना आखली आहे. या झाडांना पाणी, संरक्षण जाळी बनवून त्यांची वाढ होईपर्यंत लक्ष देण्यात येणार आहे.

# स्वामी समर्थ पालखी परिक्रमाची अन्नछत्र मंडळात सांगता



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली गेल्या २७ वर्षापासून न्यासाकडून श्री स्वामी समर्थ पालखी परिक्रमा काढण्यात येते. यंदाही महाराष्ट्रसह कर्नाटक, गोवा राज्यातून पालखी पादुकांची परिक्रमा होऊन गुरुवारी सायंकाळी अक्कलकोट अन्नछत्र मंडळात याची सांगता झाली.

या पालखीचे सोलापुरातून आगमन होताच अक्कलकोट मार्गावर असलेल्या विजय बाग पालखी विसावा येथे अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले. या बरोबरच विजयव्हिला या फार्महाऊस येथे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, तेजस्विनीराजे भोसले, हर्षवर्धनराजे भोसले, स्वामिनी भोसले यांच्यासह हिरकणी संस्थेच्या महिला पदाधिकारी व सदस्यांनी पालखीचे दर्शन घेऊन पूजन केले. त्यानंतर शहरातील खंडोबा मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पालखीचे आमगन होताच फटाक्यांची आतषबाजी करून श्री स्वामी समर्थ महाराज की जयचा जयघोष करण्यात आला. बुधवार पेठेतील समाधी मठ येथेही पालखीचे पूजन झाले. याप्रसंगी चोळप्पा महारांचे वंशज उपस्थित होते.

शहरातील प्रमुख मार्गावरून सवाद्य मिरवणुकीने पालखीचे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथे आगमन झाल्यानंतर वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, प्रथमेश इंगळे व पुरोहित मंदार पुजारी यांच्या उपस्थितीत आरती झाली. त्यानंतर अन्नछत्र मंडळात पालखी विसावली. यावेळी उपाध्यक्ष अमय खोबरे, सचिव श्यामराव मोरे, दत्तात्रय जाधव, विश्वस्त व पालखी पराक्रमाचे मुख्य संयोजक संतोष मोसले, मनोज निकम, अरविंद शिंदे, वैभव नवले आदी उपस्थित होते.


**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109



(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत शाहू महाराज जयंती साजरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, सहशिक्षक बसवराज बिराजदार, लक्ष्मण कांबळे यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. शाळेतील ओमकार बिंगी,लक्ष्मी अणकल, श्रद्धा आहेरवाडी आदी विद्यार्थ्यांनी शाहू महाराज यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितले. विविध गीत सादर केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली गुजर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.


## अकलूज नगरपरिषद,अकलूज

**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**
**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**
Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./अनप/५५५/२०२५ दिनांक :-२५/०६/२०२५

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**
**जाहिर निविदा सूचना क्र. ०१/२०२५**

मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद, अकलूज हे खालील कामांसाठी पात्र जाहिर निविदा/दरपत्रक मागणी करत आहोत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा संचाची किंमत (ना परतावा धनाकर्षाद्वारे) रूपये | इसारा / बयाणा रक्कम रूपये | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | अकलूज नगरपरिषद कार्यालयाकडील संगणक व तदानुषंगिक साहित्याचा पुरवठा व देखभाल दुरुस्ती करणे. | ५००/- | ५०००/- | सन २०२५-२६ करिता |
| ०२ | नगरपरिषद कार्यालयातील सर्व संगणक लॅन केबल द्वारे जोडून नेटवर्किंग करणे करिता निविदा मागवणे बाबत. | ५००/- | ५०००/- | आवश्यकतेनुसार |


| अ.क्र. | तपशील | ठिकाण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | निविदा विक्री | आवक जावक विभाग | दि.३०/०६/२०२५ ते दि-०७/०७/२०२५ कार्यालयीन वेळेत |
| ०२ | निविदा स्विकृती | | |
| ०३ | निविदा उघडणे | मा. मुख्याधिकारी कक्ष | दि. ०८/०७/२०२५ सकाळी ११.०० वाजता |

या बाबत अधिक माहिती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या संगणक विभागाकडे मिळेल.

कोणतेही दरपत्रक/निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार अकलूज नगरपरिषद, अकलूज यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दहा (हिंदीत) २) जहाज ३) वाघ (हिंदीत) ४) एक अभिनेता - कमल *** ५) गायीचे पिल्लू ६) मुस्लीम बांधवांचा एक सण ८) एक प्रख्यात आध्यात्मिक प्रवचनकार- ***** पै ११) मनसे अध्यक्ष-** ठाकरे १३) एखादी वस्तू खाण्याची वा पिण्याची झालेली अनावर इच्छा १५) अगदी मंद गतीने १६) शिवसेनेचे मुखपत्र असलेले दैनिक १७) अस्वलांचा खेळ करणारे १८) भिंतीवरील सरपटणारा प्राणी २१) भारताचे माजी पंतप्रधान-*** नेहरू२३) समुद्राच्या पाण्याची चव २५) महिना २६) वरल्या मनाने २७) चलाख, त्वरेने हालचाल करणारा २८) एक औषधी काटेरी पानांची वनस्पती २९) विहिरीतून पाणी उपसण्याचे पूर्वीचे साधन ३०) ससा आणि *** याच्या शर्यतीची गोष्ट प्रसिध्द आहे ३१) साखळी, **कोयंडा ३२) पूर्ण गच्च भरलेले, हाऊसफुल ३४) माकड ३८) बेचव ४०) सांडपाणी वाहणारा नाला ४२) अतिशय मोठे असे ४३) ब्रेड (मराठीत)

**आडवे शब्द :** १) पुणे येथील प्रसिध्द गणपती ७) महाराष्ट्राशेजारचे राज्य ९) मनातील खंत १०) शर्ट (मराठीत) १२) एक म्हण - ** घर पोकळ वासा १३) शरीर १४) एक प्रगत देश १७) आठवड्याचे दिवस १६) वर्ष (हिंदीत) १९) थंडीत गळ्याभोवती गुंडाळतात तो २०) लपाछपीचा खेळ २२) फॅक्टरी २४) टाईम (मराठीत) २५) आईची बहीण २७) भाकरीचा एक चतुर्थांश भाग ३०) खर्चात केलेली बचत ३२) बारा वर्षांचा काळ ३३) उपरोधिकपणे एखाद्याला बोलणे-दिल्या घरी सुखी ** ३४) गंध, परीमळ ३५) मुरमाड जमीन, रांग ३६) दोन दरवाजे किंवा खिडकीच्या दारामधील किंचितसी मोकळी जागा, भेग ३७) मनोकामना पूर्ण होण्यासाठी देवाला घातलेले साकडे ३९) एक मुस्लीम संत ४०) किल्ला ४१) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) जेवताना बसावयाची लाकडी फळी ४४) नशीब (इंग्रजीत) ४५) खेळावयाच्या पत्त्याच्या पानातील एक प्रकार, बदाम-इसपिक- .... ४६) शंभर (हिंदीत)

## सुडोकु - 286

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | 1 | | | 4 | | | 2 |
| 6 | | 9 | 5 | | 7 | 3 | 8 | |
| | | 7 | | | | 4 | | |
| | | 6 | 3 | | 2 | | 1 | |
| 2 | 1 | | | | | | | 6 |
| 7 | | | 9 | | | 8 | 2 | 4 |
| 3 | | | 6 | | 1 | 2 | | 8 |
| 9 | 6 | | 7 | | | 1 | | 5 |
| | | 5 | 2 | | | 6 | 7 | |

